| MHYA050000942026 | दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १४/२०२६<br>प्रिती व इतर वि. निरंक |
|---|---|

## <u>निशानी क्रमांक ०१ वरील आदेश</u>

**(**दिनांक १६/०४/२०२६ रोजी पारीत**)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मुंबई विनीमयाचे धारा ८ सन १८२७ चे नियम २ चे तरतुदीनुसार वारस प्रमाणपत्र मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे असे कथन आहे की, ते मयत नामे राजशेखर वासुदेवराव मांडवगडे यांच्या मुली आहेत. राजशेखर वासुदेवराव मांडवगडे यांचा दिनांक ०१/१२/२००३ रोजी पुसद, जि. यवतमाळ येथे व अर्जदारांची आई नामे मंगला राजशेखर मांडवगडे यांचा दिनांक ०६/०७/२०२४ रोजी मृत्यु झाला आहे.

३. मयत राजशेखर वासुदेवराव मांडवगडे व मंगला राजशेखर मांडवगडे यांच्या निधनानंतर त्यांना अर्जदार यांच्या व्यतिरिक्त कोणीही कायदेशीर वारस नसल्याने वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी सदरचा अर्ज शासकीय तसेच निमशासकीय कामांकरीता राजशेखर वासुदेवराव मांडवगडे व मंगला राजशेखर मांडवगडे यांचे कायदेशीर वारस असल्याचा दाखला मिळण्याकरिता केलेला आहे.

४. अर्जदार हेच मयत राजशेखर वासुदेवराव मांडवगडे व मंगला राजशेखर मांडवगडे यांचे वारस असल्याचे सिदध करणेकरीता खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केला आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मयत राजशेखर वासुदेवराव मांडवगडे व मंगला राजशेखर मांडवगडे यांचे मृत्यु प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती | यादी नि.क्र.३ मधील दस्त क्र. १ व २ |
| २ | पोलिस पाटील पुसद शहर यांनी दिलेले वारस प्रमाणपत्र | यादी नि.क्र.३ मधील दस्त क्र. ३ |
| ३ | मयत मंगला राजशेखर मांडवगडे व अर्जदारांच्या आधार | यादी नि.क्र.३ मधील दस्त क्र. ४ ते ६ |

| | | |
|---|---|---|
| | कार्डच्या प्रमाणित प्रती | |
| ४ | अर्जदार क्र. १ यांचे पुराव्याकामी शपथपत्र | नि.क्र.१२ |
| ५ | मातृभूमी वृत्तपत्रात दिलेली जाहिर नोटिस | नि.क्र.११ |

अर्जदाराने नि. क्र.१३ पुरावा बंद पुरसीस दिली.

अर्जदारांचे विधिज्ञांचा युक्तीवाद विस्तृततपणे ऐकण्यात आला.

५. निशानी क्र.१ वरील आदेशाद्वारे सर्व सामान्यांकडून हरकत आक्षेप नोंदविण्याकरीता जाहीर प्रगटन मातृभूमी या वृत्तपत्राचे दिनांक ०७/०२/२०२६ च्या आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आले. विहीत मुदतीत अर्जदार यांनी दाखल केलेल्या सदरच्या अर्जास कोणीही आक्षेप नोंदविला नाही. सबब प्रस्तुत अर्ज निर्वीवादीत राहिला.

६. साक्षीदार याने त्याच्या पुराव्यात अर्जातील विवाद कथनांचा हुबेहुब उहापोह केला व पुराव्यामध्ये मयताशी नाते संबंध आणि वारस असल्याचा दर्जा प्रर्कषाने उदघृत केला आहे. साक्षीदार यांच्या पुराव्यातील विधानांचे कोणत्याही प्रकारे खंडण झालेले नाही. मयत राजशेखर वासुदेवराव मांडवगडे व मंगला राजशेखर मांडवगडे यांच्या मृत्युची सिदधता मृत्युप्रमाणपत्र यादी नि.क्र.३ मधील दस्त क्र. १ व २ अन्वये सिध्द होत आहे. अर्जदार क्र.१ व २ हे मयत राजशेखर वासुदेवराव मांडवगडे व मंगला राजशेखर मांडवगडे यांच्या मुली आहेत. यावरुन मयत राजशेखर वासुदेवराव मांडवगडे व मंगला राजशेखर मांडवगडे यांना इतर कोणतेही वारस नाही हे स्पष्ट होत आहे. खंडणाअभावी दाखल पूराव्यावर विश्वास न ठेवण्याचे कोणतेही संयुक्तिक कारण अभिलेखावर उपलब्ध नाही. उपरोक्त परिस्थितीनुसार व कायदयातील तरतुदींची पाहणी करता अर्जदार क्र. १ व २ हे मयत राजशेखर वासुदेवराव मांडवगडे व मंगला राजशेखर मांडवगडे यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र ठरलेले आहेत. परिणामतः निम्नलिखित आदेश पारित करण्यात येते.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्रमांक ०१ नामे प्रिती राजशेखर मांडवगडे व अर्जदार क्रमांक ०२ नामे सौ. शिल्पा सचिन दवंडे यांना मयत राजशेखर वासुदेवराव मांडवगडे व मंगला राजशेखर मांडवगडे यांचे वारस म्हणुन घोषित करण्यात येत आहे.

३. अर्जदार यांच्याकडून नियमानुसार न्यायालयीन शुल्क भरुन बॉम्बे रेगयुलेशनचे पुरवणी ब मधील विहीत नमुन्यात वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ARJUN BHAUSAHEB JADHAV
Date: 2026.04.16 11:19:22 +0530

ठिकाण – पुसद (ए. बी. जाधव)

दिनांक - १६/०४/२०२६ ३रे दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पुसद